ePaper

# संतोष देशमुखांच्या आरोपींना पाठिशी घालणाऱ्यांची आता खैर नाही

| वर्ष - 8 | अंक - 232 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- रोहितने खेळपट्टीवर टिकणे आवश्यक!
- विल्यम्सन विरुद्ध फिरकी संघर्ष
- दिल्लीत महिलांना २५०० रुपये!
- ट्रम्प उघडपणे अपमान करत आहेत


www.mahaenews.com | रविवार, दिनांक 9 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## न्यूझीलंडला नमवून ‘चॅम्पियन्स ट्रॉफी’ पटकावणार

# ‘टीम इंडिया’ च ठरणार ‘चॅम्पियन’! यशस्वी भव:!

## दुबईच्या खेळपट्टीवर भारताच्या ‘फिरकी’ पुढे न्यूझीलंडचे ‘घालीन लोटांगण’!

| दुबई | वृत्तसंस्था | महाईन्यूज

**रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली ‘टीम इंडिया’ ने दुबईत ‘चॅम्पियन्स ट्रॉफी’ च्या अंतिम सामन्यात धडक मारली आहे. आता गाठ आहे ती न्यूझीलंडच्या संघाशी ! भारताने ऑस्ट्रेलियाचा तर न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून या ‘चॅम्पियन्स ट्रॉफी’ वर दावा सांगितला आहे.**




**भारतासाठी जणू ‘होम पीच’च !**

दोन्ही संघ दुबईमध्ये हजर झाले असून रविवारी सायंकाळी ही मानाची लढत होईल, पण खेळपट्टीवर पाय ठेवण्यापूर्वीच भारताचे पारडे मोठ्या प्रमाणावर जड दिसत आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने भारताचा संघ दुबईच्या बाहेर गेलेलाच नाही, त्यामुळे भारतासाठी हे ‘होम पीच’च झाले असून त्याचा प्रचंड फायदा होणार आहे. या उलट, न्यूझीलंडच्या संघाला बऱ्याच ठिकाणी आणि वेगवेगळ्या हवामानात खेळावे लागले आहे.

**भारताची ‘फिरकी’ चौकडी जगश्रेष्ठ !**

या सामन्यामध्ये भारताकडे असलेला फिरकी गोलंदाजांचा ताफा हा जगश्रेष्ठ मानला जातो. आधी याच खेळपट्टीवर सरावलेला भारताचा संघ, त्याने येथेच जिंकलेले चार सामने, आणि खेळपट्टी पुरेपूर फिरकीला मदत करत असताना गोलंदाजांना आलेला आत्मविश्वास, या जोरावर भारताचा संघ ‘चॅम्पियन्स ट्रॉफी’ खेचून आणणार आहे, हे निश्चित !

**वरूण, कुलदीपची डोकेदुखी..**

भारतीय संघात नव्याने आलेला वरुण चक्रवर्ती हा सर्व सामन्यांमध्ये ‘गेम चेंजर’ ठरला आहे. त्याने टाकलेल्या वेगवान गुगली वर प्रतिस्पर्ध्यांची भंबेरी उडत आहे. त्याचप्रमाणे, कुलदीप यादवने डाव्या हाताने टाकलेले ‘चायनामन’ प्रतिस्पर्धी फलंदाजाच्या डोक्याबाहेरचे काम झालेले आहे. या दोघांना रवींद्र जडेजा आणि अक्षर पटेल यांची फिरकी सर्वोत्तम साथ देणार, याची रोहित शर्माला खात्री आहे.




**रोहित, विराट, गिल यांची फळी**

भारतीय संघ सध्या संपूर्ण क्रिकेट जगतात सर्वोत्तम संघ असून विराट कोहली, शुभमन गिल, श्रेयस अय्यर, के. एल. राहुल आणि हार्दिक पांड्या यांच्यासारखी सर्वोत्तम फलंदाजी ही भारताच्या दिमतीला आहे. शिवाय वेगवान मोठी खेळी खेळण्याची परंपरा कर्णधार रोहित शर्मा कडे आहेच. रवींद्र जडेजा, अक्षर पटेल या अष्टपैलू खेळाडूंकडेही मोठी खेळी खेळण्याची क्षमता नक्कीच आहे.

**न्यूझीलंडपेक्षा कित्येक पटीने भारी**

अंतिम फेरीतल्या दोन्ही संघांची तुलना केली, तर दुबईच्या या खेळपट्टीवर न्यूझीलंडपेक्षा भारतीय संघ हा कित्येक पटीने वरचढ असाच आहे. न्यूझीलंडचा कर्णधार विल्यम्सनने सामना सुरू होण्यापूर्वीच हे मान्य करून टाकले आहे, यातच सामन्याचे भवितव्य स्पष्ट दिसत आहे. विल्यम्सन म्हणाला, की एकाच खेळपट्टीवर सामने खेळण्याचा आणि ते जिंकण्याचा फायदा भारताच्या संघाला नक्की होणार आहे. पण, न्यूझीलंडचा संघ हा अतिशय जिद्दी आणि चिकट आहे, त्यामुळे त्यांना कमी लेखून चालणार नाही. आम्ही पूर्ण तयारीनिशी लढतीला सज्ज आहोत, असे भारताचा कर्णधार रोहित शर्मा यानेही सांगून टाकले आहे.

**क्रिकेटप्रेमींसाठी पर्वणी..**

आजची रविवारची सायंकाळ ही तमाम क्रिकेटप्रेमींसाठी मोठी पर्वणी असून संपूर्ण देशभर आज सुट्टी ‘एन्जॉय’ करण्याचे मनसुबे रचताना भारतीयांनी रात्री उशिरा जिंकल्यानंतर जल्लोष करण्याचे नियोजन देखील केले आहे.

## विक्रमादित्य रोहित आणि विराट

या अंतिम सामन्यात टॉस उडवताच रोहित शर्माचे नाव सुवर्ण अक्षरात लिहिले जाणार आहे. या स्पर्धेत भारताने एकही सामना गमावलेला नाही. त्याने आत्तापर्यंत ‘आयसीसी’ च्या तीनही प्रकारातील स्पर्धांमध्ये कर्णधारपदाची भूमिका सांभाळली आहे. २०२३ ची जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा, त्याच वर्षी एक दिवशीय विश्वचषक, २०२४ मधील टी ट्वेंटी विश्वचषकाचा समावेश आहे. आज तो चौथ्यांदा अंतिम सामन्यात कर्णधार म्हणून जबाबदारी पार पाडत आहे. टॉस उडवल्यानंतर तो ‘टीम इंडिया’ चा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी याच्या विक्रमाची बरोबरी करणार आहे. त्याचप्रमाणे या संपूर्ण स्पर्धेत विराट कोहलीने विक्रमापाठोपाठ विक्रम तोडले आहेत आणि स्वतःचे नवीन विक्रम प्रस्थापित केले आहेत, हे एक वैशिष्ट्य !

## मद्यधुंद तरुणाचे अश्लिल हावभाव

# आधी नंगानाच, नंतर माफीनामा!

## पुण्यात भररस्त्यात अश्लील चाळे करणारा पोलिसांच्या ताब्यात

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील गौरव आहुजा याने सार्वजनिक ठिकाणी अश्लील कृत्ये केल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. मद्यधुंद अवस्थेत असताना त्याने रस्त्यावर अश्लील वर्तन केले आणि लघुशंका केली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर त्याने माफी मागितली आहे.**

पुण्यातील रस्त्यावर लघुशंका करत अश्लील चाळे करणाऱ्या गौरव आहुजाला अखेर पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर त्याचा माफी मागतानाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. मी चुकलो, मला एक संधी द्या, असं म्हणत गौरव आहुजा माफी मागताना दिसत आहे.

**नेमकं प्रकरण काय?**

पुण्यात कायदा सुव्यस्थेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. पुण्यात सकाळच्या वेळेला BMW कारमध्ये मद्यधुंद अवस्थेत असलेल्या एका तरुणाने रस्त्यावरच अश्लील चाळे केल्याची घटना समोर आली आहे. येरवडा परिसरात हा धक्कादायक प्रकार घडला. या तरुणाने रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या महिलांसोर अश्लिल चाळे केले. यानंतर त्या तरुणाने सिग्नलवर लघुशंका केली.



या गाडीत बसलेला हा तरुण मद्य प्राशन केलेल्या अवस्थेत होता. येरवडा भागामध्ये शास्त्रीनगर चौकात स्त्रियांच्या समोर त्याने अश्लील चाळे केले. हे दोघेही तरुण दारु प्यालेले होते.

### गौरवला पोलिसांनी ताब्यात घेतलं

गौरव आहुजा असं या प्रकरणातील आरोपीचं नाव आहे. या प्रकरणामुळे शहरात वातावरण चांगलंच तापलं आहे. पुण्यात नंगानाच करणाऱ्या या तरुणाला आता पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. त्याचा एक व्हिडीओही समोर आला आहे. या व्हिडीओत तो या प्रकरणी माफी मागताना दिसत आहे. "मी गौरव आहुजा, राहणार पुणे, काल माझ्याकडून जे कृत्य झालं होतं, ते खूप चुकीचं होतं. मी मनापासून माफी मागतो. संपूर्ण जनता, पोलीस प्रशासन आणि शिंदे साहेबांची माफी मागतो. मला माफ करा आणि मला एक संधी द्या. सॉरी", असे गौरव आहुजाने म्हटले आहे.

### गौरवचे वडील काय म्हणाले?

पुण्यात नंगानाच करणाऱ्या या तरुणाच्या वडिलांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. गौरव आहुजा याचे वडील मनोज आहुजा यांनी देखील या घटनेवर संताप व्यक्त केला. 'गैरव माझा मुलगा असल्याची लाज वाटते, त्याने सिग्नलवर लघुशंका नाही केली तर माझ्या तोंडावर केली आहे. मुलाचा मोबाईल सकाळपासून बंद आहे. माझ्यावर जी काही कारवाई होईल ती मला मान्य आहे, असं मनोज अहुजा यांनी म्हटलं आहे.

## प्रदूषणाच्या विरोधात अभियंत्यांचा मूक मोर्चा

## ताथवडे आणि मारुंजीतील नागरिकांनी मूकमोर्चा काढला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाढत्या हवा प्रदूषणाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी वाकड, ताथवडे आणि मारुंजी परिसरातील नागरिकांनी शनिवारी मूकमोर्चा काढला. तेवीसहून अधिक गृहनिर्माण सोसायट्यांतील पाचशेहून अधिक रहिवासी हवा प्रदूषण विरोधी मुकमोर्चात प्रशासनाचा निषेधार्थ तोंडाला काळे मास्क व हाताला लाल रिबन बांधून सहभागी झाले होते.**




वाकड-ताथवडे हौसिंग सोसायटीज फोरम यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा कोहिनूर कोर्टयार्ड वन सोसायटी पासून इंदिरा स्कूल मार्गे वाकडकर चौकापर्यंत नेण्यात आला. या मोर्चात ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नागरिकांनी मूक मोर्चाद्वारे पर्यावरण, प्रदूषण, नागरिकांना भेडसावणाऱ्या आरोग्याच्या समस्यांकडे लक्ष वेधले. सिमेंट मिक्स धूळ आणि रस्त्यावरील अवजड वाहनांमुळे होणारे प्रदूषण यामुळे परिसरातील हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून श्वसनाचे आजार वाढत असल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. 'धुळीने भरली आमची छाती', 'पिंपरी-चिंचवड महापालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पीएमआरडीए हवेतील प्रदूषण कमी करा', 'प्रशासन झोपले आहे, नागरिक त्रासले आहेत', 'नको धूळ, शुद्ध हवा आमचा अधिकार', 'दुर्लक्ष करी सरकारी खाती, धुळीने भरली आमची छाती', 'आमच्या जीवाशी खेळू नका, आम्ही कर भरतो, धूळ खाण्यासाठी नाही', अशा आशयाचे विविध फलक हातात धरून रहिवाशी मोर्चात सहभागी झाले होते. शांततेत निघालेल्या या मुकमोर्चात वाहतुकीला आणि विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये म्हणून स्वयंसेवकांनी काळजी घेतली होती. अनुचित प्रकार घडून नये म्हणून पोलिसांचाही बंदोबस्त तैनात होता.नागरिकांना स्वच्छ हवा मिळाली पाहिजे. वाढत्या हवा प्रदूषणाबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात. अन्यथा आंदोलन आणखी तीव्र केले जाईल. स्वच्छ हवा मिळेपर्यंत आम्ही लढत राहू, रहिवासी अशोक साळुंखे यांनी सांगितले. प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करून आवश्यक ती आरोग्यसेवा पुरवावी. रस्त्यांवरील झाडांची देखभाल आणि पाणी नियमित करावे. रस्त्यांची नियमित दोन वेळा साफसफाई करून धुळीचे प्रमाण कमी करावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनावर कठोर कारवाई केली जावी. रस्त्यांवरील धूळ कमी करण्यासाठी टँकरद्वारे नियमितपणे पाण्याचा फवारा मारला जावा.वाकड-ताथवडे हौसिंग सोसायटीज फोरम यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा कोहिनूर कोर्टयार्ड वन सोसायटी पासून इंदिरा स्कूल मार्गे वाकडकर चौकापर्यंत नेण्यात आला.

### पीएमआरडीए हवेतील प्रदूषण कमी करा

नागरिकांनी मूक मोर्चाद्वारे पर्यावरण, प्रदूषण, नागरिकांना भेडसावणाऱ्या आरोग्याच्या समस्यांकडे लक्ष वेधले. सिमेंट मिक्स धूळ आणि रस्त्यावरील अवजड वाहनांमुळे होणारे प्रदूषण यामुळे परिसरातील हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून श्वसनाचे आजार वाढत असल्याचा दावा नागरिकांनी केला आहे.मंडळ आणि पीएमआरडीए हवेतील प्रदूषण कमी करा', 'प्रशासन झोपले आहे.

## गजबजणाऱ्या पिंपरी कॅम्पने अनुभवला

# वाहन मुक्त दिवस!

### साई चौकात झुंबा, लाईव्ह संगीत, सायकलींग अन् पथनाट्याचे आयोजन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिवसेंदिवस शहरातील वाहनांची संख्या वाढत आहे,त्यामुळे वाहतुकीच्या समस्या निर्माण होत आहेत. तसेच पर्यावरणाला हानी पोहचत आहे. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने नियोजन करून शहरात प्रथमच गजबजलेल्या पिंपरी बाजारपेठेत वाहन मुक्त दिवसाचे आयोजन करून स्तुत्य उपक्रम राबविला आहे. तसाच उपक्रम शहरातील इतर ठिकाणीही राबवावा असे प्रतिपादन खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ८ व ९ मार्च २०२५ रोजी सकाळी ८ ते रात्री ९ वाजेपर्यंत पिंपरी बाजार परिसरात साई चौक ते शगून चौक आणि शगून चौक ते महर्षी वाल्मिकी चौक अशा अनोख्या प्रकारच्या पहिला वाहन-मुक्त दिवसाचे आयोजन केले आहे. याचे उद्घाटन खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांच्या हस्ते झाले.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, माजी नगरसदस्य डब्बू आसवानी,संदीप वाघेरे,माजी नगरसदस्या निकीता कदम,मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता बापू गायकवाड,उप आयुक्त सिताराम बहुरे,क्षेत्रीय अधिकारी किशोर ननावरे,कार्यकारी अभियंता प्रेरणा सिनकर, राजेंद्र शिंदे,नितीन निंबाळकर,बाळू लांडे, विजय भोजने, यांच्यासह स्थानिक व्यापारी व दुकानदार, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते तसेच महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### दोन दिवस घेता येणार वाहन मुक्त खरेदीचा आनंद

वाहन-मुक्त दिनानिमित्त झुंबा, लाईव्ह संगीत, सायकलींग, पथनाट्य, नृत्यप्रदर्शन, खेळ यांसारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन आले आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना दोन दिवस पिंपरी बाजारात वाहन मुक्त वातावरणात खरेदीचा आनंद घेता येणार आहे तसेच लहान मुलांना विविध खेळणी प्रकारांचा,सर्वासाठी विविध खाद्यपदार्थांचा,सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचा देखील उपक्रमात समावेश आहे.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा पहिला 'वाहन मुक्त दिन' हा एक स्तुत्य उपक्रम ठरणार आहे. यामुळे आज ज्या पिंपरी मार्केट मधील रस्त्यावर चालता येत नव्हते त्या रस्त्यांवर आज लहान मुले खेळ खेळताना दिसत आहेत. या माध्यमातून पादचारी नागरिकांना चालण्यासाठी चांगले मार्ग उपलब्ध होणार आहेत. याबद्दल महापालिका प्रशासन कौतुकास पात्र आहे.
> **–श्रीरंग बारणे,** खासदार

## देहू ते भंडारा डोंगर दिंडी डोळ्याने डोळ्याचे पारणे फिटले

### त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी; जगद्गुरू संत तुकोबाराय वैकुंठ गमन सोहळ्याला प्रारंभ

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**धन्य तुकोबा समर्थ । जेणे केला हा पुरुषार्थ ॥ हेच वचन मनात ठेवून फुलांनी सजलेल्या पालखीत तुकोबांच्या चांदीच्या पादुका, टाळ – मृदंगाचा गजर, ज्ञानोबा तुकोबांचा नामघोष करीत हजारोंच्या उपस्थितीत देहू ते भंडारा डोंगर मार्गावर दिंडी सोहळ्याने डोळ्यांचे पारणे फेडले.**



जगद्गुरु तुकोबारायांच्या पंचमवेद गाथा भांडारातील ज्ञानावर अध्यात्मिक पोषण झालेल्या वारकरी बांधवांकडून ३७५ व्या सदेह वैकुंठ गमन सोहळ्याचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ८ ते १७ मार्च २०२५ या दहा दिवसाच्या कालावधीत हे आयोजन करण्यात आले आहे.


जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठगमनाला येत्या १६ मार्च रोजी अर्थात तुकाराम बीजेच्या दिवशी ३७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सव सोहळा साजरा होत आहे. या सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आणि संगीत गाथा पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. श्री जगद्गुरू तुकाराम महाराज संस्थान, श्री क्षेत्र देहू यांनी हा मान पुणे जिल्ह्यास दिला आहे. श्री क्षेत्र आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेचे अध्वर्यू हभप मारूतीबाबा कुऱ्हेकर महाराज आणि वारकरी रत्न हभप ज्ञानेश्वर माऊली कदम महाराज यांच्या नेतृत्वाने गाथा पारायण सोहळा येत्या ९ मार्च ते १७ मार्च या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. भंडारा डोंगराच्या पायथ्याला हा सोहळा होत आहे.

या सोहळ्याची सुरुवात शनिवार दिनांक ८ मार्च रोजी दुपारी तीन ते पाच या वेळेत श्रीक्षेत्र देहू ते श्रीक्षेत्र भंडारा डोंगर अशा भव्य दिंडी सोहळ्याने करण्यात आली. जगद्गुरू तुकोबारायांच्या पाच किलो चांदीच्या पादुकांची देहू येथील मंदिरात विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर पादुका सजविलेल्या पालखीत ठेवून टाळ मृदंगाच्या आणि ज्ञानोबा तुकाराम या नामघोषात मंदिराबाहेर आणण्यात आल्या. पालखी समोर दोन शुभ्र अश्व होते. मंदिराबाहेर महिलांनी डोक्यावर कलश आणि तुळसी वृंदावन घेऊन उभ्या होत्या. नंतर पालखी सजविलेल्या रथात ठेवली गेली. रथाला महेंद्रशेठ बाळकृष्ण झिंझुर्डे (२०२३ चे देहू ते पंढरपूर पालखी चे मानकरी ) यांची अत्यंत देखणी खिलारी बैलजोडी होती. पालखी सोबत माजी आमदार विलास लांडे उपस्थित होते. खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनीही पालखीला भेट देऊन दर्शन घेतले.

#### दिंडी सोहळ्याचे वैशिष्ट्य

या दिंडी सोहळ्यामध्ये संत तुकाराम महाराजांच्या पाच किलो चांदीच्या पादुका ठेवण्यात आल्या होत्या. प्रत्येकी ३७५ धर्मध्वजधारी, कलशधारी, तुळसीधारी, कीर्तनकार, टाळकरी, मृदंग सेवक, पखवाज वादक, ब्रह्मविणाधारी व तुकाराम नाव असलेले चोपदार सहभागी झाले होते .

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंचाच्या अपूर्ण गोष्टींत केव्हांही समाधान मिळणार नाही

सर्व अनुभवांत आत्मप्रचीती ही खरी. दुसऱ्याने पुष्कळ अनुभव सांगितले, परंतु स्वत:ला येईल तो अनुभव हाच खरा महत्त्वाचा. आत्मप्रचीतीने जागरूकता येईल, भाव वाढेल, साधनाला जोर येईल आणि भगवत्प्राप्ती लवकर होईल. संतांनी पुष्कळ गोष्टी आजवर आपल्याला सांगितल्या परंतु त्यांना देव जसा हवासा वाटला तसा आपल्याला वाटतो का ? प्रपंच करीत असताना भगवंताची आपल्याला आवश्यकता वाटते का ? आपण असा विचार करावा की, आपण लहानाचे मोठे झालो, विद्या संपादन केली, नोकरी मिळाली, लग्न झाले, मुलेबाळे झाली, घरदार केले परंतु आपल्याला अजून काहीतरी हवेसे वाटतेच आहे ! हे आपले 'हवेपण' केव्हा संपणार ? आपण नोकरी करतो, कोणी वकिली, डॉक्टरकी; नोकरी करणारा, मालकाला आपल्याशिवाय दुसरा कोणी नोकर मिळणार नाही म्हणून काही नोकरी करीत नाही किंवा अशीलाला कोणी दुसरा वकील मिळणार नाही म्हणून वकील वकिली करीत नाही. म्हणजेच नोकरीवाला काय, डॉक्टर काय, वकील काय कोणीही आपापले कर्म केवळ त्या कर्मासाठीच करीत नाही, तर त्यातून आपल्याला सुख मिळेल ह्या ईर्षेने तो ते करीत असतो. परंतु आपण पाहतोच की सर्व काही केले, आयुष्यही संपले, तरी काहीतरी करण्याचे राहूनच जाते; त्याला पूर्णता येत नाही. एखादी गोष्ट आपल्याला मिळाली की, आता ह्यापुढे काही करायचे उरले नाही असे काही वाटत नाही. आता काहीएक नको आहे, जेवढे आहे त्यात समाधान आहे असे कधी वाटते का ? पुढे कसे होईल, हे सर्व टिकेल का, ह्यात आणखी भर कशी पडेल याची विवंचना कायमच ! एखाद्याचे लग्न ठरले ते झाले की आता प्रपंचाची काळजी मिटली असे वाटते का ? लग्न झाल्यावर, समजा पाच वर्षे मूल झाले नाही, तरी हा काळजी करतोच; आणि समजा, मुलेच मुले झाली तरीही याची काळजी आहेच ! तेव्हा या प्रपंचाच्या गोष्टी अपूर्ण आहेत. त्यांतून समाधान लाभेल हे कसे शक्य आहे ? ह्या गोष्टी एकांतून एक निर्माण होणाऱ्या आहेत. ज्या ज्या म्हणून सुखाच्या गोष्टी मानल्या त्या सर्व जरी एकत्र केल्या तरी त्यांतून समाधान निर्माण होणार नाही. ज्या गोष्टी अपूर्णच आहेत त्यांतून पूर्णस्वरूप असलेले समाधान कसे लाभेल? समजा, एका वेड्याच्या इस्पितळात दोनशे वेडे आहेत; जर कुणी म्हणाले की, आता आणखी शंभर वेडे आले की एक शहाणा त्यांतून निर्माण होईल, तर हे कधी शक्य आहे का ? बोधवचन:- मनुष्याला किती असले म्हणजे पुरे होईल हे ठरलेले नाही. आहे त्या परिस्थितीमध्ये आपण समाधान मानले की जे आहे ते पुरेल.



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**छत्रपती शिवराय आणि छत्रपती शंभुराजे यांच्या संदर्भात अवमानास्पद उद्गार काढण्याची जणू चढाओढच लागली आहे. हा सगळा निंदनीय प्रकार वेळीच थांबायला हवा. सरकारनं सुद्धा अशा नतद्रष्टांना तातडीनं डांबून त्यांना कायद्याच्या चौकटीत धडा शिकवायला हवा !**

# छत्रपतींचा अपमान करणाऱ्यांना, खरंच, लाज नाही का वाटंत ?



### सगळा प्रसिद्धीचा 'स्टंट' !

हल्ली काय झालंय, प्रसिद्धी मिळवायची असेल तर छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंवा आपले जे युगपुरुष आहेत, त्यांच्याबाबत अवमानकारक शब्द काढले की झालं..मग त्यांचे समर्थक पुढे येतात आणि विरोधक तर आंदोलनावर आंदोलने करतात. यातून नेमकं निष्पन्न काय होतं..?

### पुरावे न देता बोला नुसतं..

सुरुवातीला अभिनेता राहुल सोलापूरकर, नंतर पत्रकार संदीप कोरटकर, नंतर अबू आझमी आणि शेवटी अनिल परब.. तोंडाला येईल ते बरळू लागले आहेत..इतिहासाच्या नावानं गरळ ओकू लागले आहेत ! यातील अबूमियाँ यांनी थेट औरंग्याचे गुणगान गाऊन त्याला आपल्या देव्हाऱ्यात ठेवलं आहे, तर अनिल परबांनी स्वत:ची तुलना शंभूराजांबरोबर केली आहे. सोलापूरकर मोकाट आहे आणि कोरटकर तर फरारी आहे !

### उदयनराजेंचा तोडगा योग्यच !

छत्रपतींवर शिंतोडे उडवणाऱ्या अशा महाभागांसाठी कडक कायदे व्हावेत, त्यांना ताबडतोब कठोरात कठोर शिक्षा व्हावी हा छत्रपती उदयनराजे यांनी सुचवलेला तोडगा म्हणूनच योग्य वाटतो. छत्रपतींच्या घराण्याबद्दल बेताल वक्तव्य करणाऱ्यांना कठोर शिक्षा करावी, अशी उदयनराजेंची मागणी आहे, आणि सध्याच्या परिस्थितीत ती योग्यच वाटत आहे.

### कसली चौकशी करता?

या पार्श्वभूमीवर उदयनराजे नक्की काय म्हणाले, ते बघू या..चौकशी बिवकशी काही नाही, अधिवेशन सुरु आहे, माझं प्रामाणिक मत आहे, विशेष कायदा संमत केला पाहिजे. बेताल वक्तव्य करणाऱ्यांना किमान दहा वर्ष शिक्षा झाली पाहिजे, ही त्यांची मागणी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा शासनमान्य अधिकृत इतिहास महाराष्ट्र शासनाने खंड स्वरुपात प्रसिद्ध करावा, त्यामुळे होणारे सारखे वादविवाद संपुष्टात येतील. कोणाला सिनेमा काढायचा असेल, सीरियल बनवायची असेल, 'सिनमॅटिक लिबर्टी' म्हणतो, त्याच्यावर सुद्धा कायदा आला पाहिजे, अशा तीन महत्वाच्या मागण्या खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांनी केल्या आहेत. सरकारनेही त्याचा गांभीर्याने विचार करायला हवा. आमच्या महाराजांचा अपमान करण्याचे धंदे आता बास झाले!

### आता शोर बंद करा.. शिकार करा !

विधिमंडळ सभागृहातील शोर आता बंद करा आणि कायदा करून शिकार करा, असे थेट आव्हान सत्तारूढ आणि विरोधी पक्षातील सर्वच राजकीय पक्षांना उदयनराजे यांनी दिले आहे. उदयनराजे पुढे म्हणाले, की असा विषय निघाला, की प्रत्येकवेळी सांगितलं जातं. आम्ही चौकशी करु, चौकशी बिवकशी काही नाही, अधिवेशन सुरु आहे, माझं प्रामाणिक मत आहे, स्पेशल कायदा पास केला पाहिजे. कायदा असा पाहिजे, म्हणजे परत कोणी, शहाजी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजमाता जिजाऊ यांच्याबाबत असं बोलण्याचं धाडस करता कामा नये. आरोपीला जामीन मिळणार नाही, बेताल वक्तव्य करणाऱ्यांना किमान दहा वर्ष शिक्षा झाली पाहिजे. डीवायएसपी दर्जाच्या अधिकाऱ्याकडून चौकशी झाली पाहिजे आणि ३० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल झालं पाहिजे. एखाद्या लोकप्रतिनिधींनं असं वक्तव्य केलं, तर त्याला त्या क्षणी अपात्र ठरवलं पाहिजे, यादेखील त्यांच्या रास्त सूचना आहेत.

### शिवरायांचा आदर्श बाळगा जरा..

सगळेजण छत्रपती शिवाजी महाराजांना दैवत मानता, त्यांचा आदर्श घेऊन काम करता ना, मग दाखवून द्या, याच अधिवेशनात कायदा पास करा, अशी मागणी उदयनराजे यांनी केली आहे. उदयनराजे पुढे म्हणाले, बाहेरुन येणारी आक्रमणं परतवून लावली कोणाच्या जोरावर? तर या देशातल्या लाखो वेगवेगळ्या समाजातल्या त्यावेळच्या पूर्वजांच्या जोरावर.. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिशा देण्याचं काम केलं. आज आपण जो मोकळा श्वास घेतोय, तो छत्रपती शिवाजी महाराजांमुळंच ना..त्यांनी त्यावेळी लोकशाहीची संकल्पना मांडलेली.. आज काय चाललय सांगा ? देव मी बघितला नाही, देवाच्या रुपानं महाराजांच्या माध्यमातून आज आपण मोकळा श्वास घेतोय, असं उदयनराजे म्हणाले आणि ते शंभर टक्के पटलं आहे.

### स्वार्थासाठी अत्यंत 'चीप पब्लिसिटी'

कोणी पण उठायचं, काहीही वक्तव्य करायचं. आमचे आराध्य दैवत आहेत, पक्ष कुठला जरी असला, तरी हे सगळे त्या पलीकडचं आहे. सामाजिक, राजकीय संघटना महाराजांचं नाव घेऊन सुरुवात करतात. आज इलेक्ट्रॉनिक, प्रिंट मीडियाच्या माध्यमातून जे वाचनात येतं, ते तुम्हाला बरं वाटतं का ? असा प्रश्न उदयनराजेंनी विचारला. या लोकशाहीत फक्त स्वार्थासाठी 'चीप पब्लिसिटी' ज्याला म्हणतो, ती मिळवण्याकरता तुम्ही महाराजांची, शहाजी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजमाता जिजाऊंची जी अवहेलना करता, ते पाहून महाराष्ट्रातील, देशातील लोक किती काळ गप्प बसतील ?

### चित्रपटासाठी कमिटी बनवा..

उदयनराजे पुढे म्हणाले, की कुठली तरी कांदबरी काल्पनिक स्वरुपात लिहितात, अशी अनेक कुटुंबं, घराणी या महाराष्ट्रात, देशात आहेत, ज्या लोकांनी आपलं आयुष्य वेचलंय.. काल्पनिक आधारावर जेव्हा तुम्ही चित्रपट प्रदर्शित करता, ते करण्याआधी इतिहासकांची एक कमिटी बनवा. चित्रपटाचं स्क्रिप्ट त्या समितीसमोर गेलं पाहिजे. ती समिती अभ्यास करेल. काल्पनिक आधारावर जे होतं, त्यातून तेढ निर्माण होतं, हे लक्षात घ्या. या सर्व तणावाच्या आणि अपमानकारक वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कळकळीची विनंती, की याच अधिवेशनात कायदा आणा. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, विरोधी पक्षनेता, सर्वपक्षीय नेते यांनी याच अधिवेशनात कायदा संमत करून दाखवावा. अन्यथा, लोकांचा तुमच्यावरील विश्वास उडेल. दंगली होतात, कारण नसताना लोक मृत्युमुखी पडतात, हे थांबवण्याचं काम सत्ताधाऱ्यांचंच नाही का.. ते तर महाराष्ट्रातील सगळ्यांचंच आहे. महाराष्ट्रात याच अधिवेशनात विशेष कायदा पास करावा, ही जशी उदयनराजेंची विनंती आहे, तशी ती सर्वांचीच असणार आहे. हे धाडसी पाऊल उचलून या महायुती सरकारनं या जहाल आणि संवेदनशील प्रश्नावर कायमचा तोडगा काढावा, ही माफक अपेक्षा करण्यात गैर काय आहे ?

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बेकायदेशीर जाहिरात फलक लागणे दु:खाचे

## मिरा-भाईंदरसाठी स्वतंत्र दिवाणी व सत्र न्यायालय मंजुर

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**“नव्या न्यायालयीन इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित राहणे ही आनंदाची गोष्ट आहे.मात्र याच कार्यक्रमाचे अनधिकृत जाहिरात फलक लागल्याचे पाहून दुःख झाल्याची खंत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांनी व्यक्त केली. मिरारोड येथे दिवाणी सत्र न्यायालयाच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते.**



### पत्रकारांचे देखील कान टोचले

मिरा भाईदर शहरासाठी स्वतंत्र दिवाणी व सत्र न्यायालय मंजुर करण्यात आले होते.उद्घाटन करण्यासाठी शुक्रवारी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी राज्याचे उप-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे,न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी,न्यायमूर्ती गैरी गोडसे आणि ठाणे जिल्हा प्रमुख व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल, मंत्री प्रताप सरनाईक, आमदार नरेंद्र मेहता, माजी आमदार गीता जैन, जिल्हाधिकारी अशोक शिंगारे,आयुक्त राधाबिनोद शर्मा उपस्थित होते.

मिरा भाईंदर शहरासाठी स्वतंत्र दिवाणी व सत्र न्यायालय मंजुर करण्यात आले होते. या न्यायालयाच्या इमारतीचे कामकाजाचे उद्घाटन करण्यासाठी शुक्रवारी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.हे उदघाटन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी राज्याचे उप-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे,न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी,न्यायमूर्ती गैरी गोडसे आणि ठाणे जिल्हा प्रमुख व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल, मंत्री प्रताप सरनाईक, आमदार नरेंद्र मेहता, माजी आमदार गीता जैन, जिल्हाधिकारी अशोक शिंगारे,आयुक्त राधाबिनोद शर्मा उपस्थित होते.न्यायालयाच्या उदघाटन कार्यक्रमाचे अनधिकृत जाहिरात फलकांबाबत न्यायमूर्ती ओक यांनी नाराजी व्यक्त केली. मुंबई उच्च न्यालयाने २०१६ अनधिकृत जाहिरात फलकांवर बंदी घातल्याचे आदेश पारित केले आहे. त्यावरून लागणाऱ्या प्रत्येक फलकांवर परवानगी क्रमांक टाकणे बांधकारक आहे. मात्र कोणत्याही जाहिरातीवर हे क्रमांक नव्हते. न्यायालयाच्या इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी बेकायदेशीर जाहिरात फलक लागत असल्याचे पाहून दुःख झाले.त्यामुळे स्थानिक महापालिका प्रशासनाने यावर कायदेशीर कारवाई, असे ते आपल्या भाषणात म्हणाले.मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना ठाणे येथील सत्र न्यायालयात धाव घ्यावी लागत होती. यात नागरिकांची परवड होत होती. आता शहरातच दिवाणी सत्र न्यायालय सुरू झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहेराज्याचे उप- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात न्यायालयीन संबंधित कोणत्याही कामात त्वरित मंजुरी देत असल्याचे भाष्य केले. यावर न्यायमूर्ती अभय ओक यांनी महाराष्ट्र शासनाच्या बदलेल्या भूमिकेबाबत समाधान व्यक्त केले. मात्र २०१८ पासून नव्या मुंबई उच्च न्यालयाच्या उभारणीसाठी ३० एकर जगा अपेक्षित असताना देखील आजवर शासनाने ४ एकरच जागा मंजूर केल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. तसेच न्यायालयाच्या कामासाठी सादर केलेल्या प्रस्तावावर शासन १० शंका काढत असल्याचे ते म्हणाले.अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणून प्रसार माध्यमांचे स्वतंत्र टिकवणे हे न्यायव्यवस्थेची जबाबदारी आहे.मात्र कार्यक्रम स्थळी जर छायाचित्रकार व पत्रकार जबाबदारीने वागत नसतील तर किमान न्यायालयीन संबंधित कार्यक्रमाला त्यांना बोलावण्याबाबत विचार करण्याची गरज असल्याचे ओक म्हणाले. कार्यक्रम स्थळी छायाचित्रकारांनी आपल्या समोरच महिलांना धक्काबुक्की केल्याचे ते म्हणाले. देशातील प्रत्येक व्यक्तीला समान न्याय देण्याची जबाबदारी ही न्याय व्यवस्थेवर आहे. मात्र राज्यात पुरेसे न्यायाधीश उपलब्ध नसल्याचे न्यायमूर्ती अभय ओक म्हणाले.२०१८ साली उच्च न्यायालय समितीने शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावनानुसार १० लाख लोकसंख्येवर ५० न्यायाधीश नेमण्याचे सुचवले आहे. मात्र अजूनही २१ न्यायाधीशांच्या खांद्यावरून ही जबाबदारी पार पाडली जात आहे.परिणामी प्रत्येकाला न्याय देण्यास आम्ही कमी पडत आहोत. असे ओक यांनी सांगितले. ” महिला दिनी मिरा भाईंदरच्या दिवाणी व सत्र न्यायालयाच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित राहणे माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे.

---

# वंदे भारत रेल्वेचे सारथ्य महिलांकडे!

## जागतिक महिला दिनानिमित्त भारतीय रेल्वेने महिलांचा सन्मान

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**जागतिक महिला दिनानिमित्त भारतीय रेल्वेने महिलांचा सन्मान करण्यासाठी आज, शनिवारी ‘वंदे भारत’ रेल्वेचे सारथ्य महिलांच्या ताब्यात दिले. लोको पायलटपासून, रेल्वे व्तवस्थापक, स्थानक प्रबंधक, तिकीट निरीक्षकासह स्वच्छता कर्मचारीपर्यंत सर्वच जबाबदाऱ्या महिलांवर सोपवल्या होत्या.**




### महिला कर्मचारी भारावून गेल्या

त्यांच्यासमवेत सर्व महिला कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छ देत स्वागत करण्यात आले. प्रवासादरम्यान ठिकठिकाणी रेल्वे स्थानकांवर जल्लोषात स्वागत करण्यात आलेसाईनगर रेल्वे स्थानकावर गुलाबांच्या फुलांची सजावट, केक कापून महिला दिन जोरदार साजरा करण्यात आला. यामुळे वंदे भारत रेल्वेच्या महिला कर्मचारी भारावून गेल्या.

आज, शनिवारी सकाळी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून निघालेल्या वंदे भारत रेल्वेचे सारथ्य वरिष्ठ व अनुभवी महिला लोको पायलट सुरेखा यादव यांच्याकडे होते. प्रवासादरम्यान ठिकठिकाणी रेल्वे स्थानकांवर जल्लोषात स्वागत करण्यात आले. या रेल्वेचे साईनगर (शिर्डी) रेल्वे स्थानकावर आगमन होताच त्यांचे हार, पुष्पगुच्छ देत स्वागत झाले. फटाक्यांची आतषबाजी साईनगर रेल्वे स्थानकावर गुलाबांच्या फुलांची सजावट, केक कापून महिला दिन जोरदार साजरा करण्यात आला.यामुळे वंदे भारत रेल्वेच्या महिला कर्मचारी भारावून गेल्या. आपल्या भावना व्यक्त करतांना त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते उद्घाटन झालेल्या ऐतिहासिक रेल्वेचे सारथ्य करण्याचा आणि साईबाबांच्या पावनभूमीत ही रेल्वे घेऊन येण्याचा मान मिळाला, हा क्षण आयुष्यातील अविस्मरणीय आहे. महिला असल्याचा अभिमान वाटतो. साईनगरमध्ये स्थानक प्रबंधक व कर्मचाऱ्यांनी या रणरागिणींचे जोरदार स्वागत केले. स्थानक प्रबंधकांनी इलेक्ट्रिक वाहन चालवत त्यांना कार्यालयापर्यंत घेऊन जात, त्यांच्या कार्याचा सन्मान केला. मध्य रेल्वेनं समाजमाध्यमावर या क्षणाला ‘ऐतिहासिक क्षण’ म्हटले आहे. भारतीय रेल्वेमधील महिलांची ताकद, समर्पण आणि नेतृत्वाचा उत्सव जागतिक महिला दिनानिमित्त साजरा करत आहे. प्रथमच वंदे भारत रेल्वे पूर्णपणं महिला कर्मचाऱ्यांनी चालवली जात आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस मुंबई – साईनगर शिर्डी वंदे भारत एक्सप्रेस आज लोको पायलट, असिस्टंट लोको पायलट, ट्रेन मॅनेजर, तिकीट एक्झामिनर, ऑन-बोर्ड केटरिंग स्टाफ या सर्व महिला कर्मचाऱ्यांसह ट्रेन रवाना झाली. भारतीय रेल्वेमधील महिलांच्या ताकद, समर्पण आणि नेतृत्वाचा गौरव करणारा हा एक अभिमानास्पद क्षण आहे! असे मध्य रेल्वेनं म्हटले आहे.आज, शनिवारी सकाळी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून निघालेल्या वंदे भारत रेल्वेचे सारथ्य वरिष्ठ व अनुभवी महिला लोको पायलट सुरेखा यादव यांच्याकडे होते.

# ट्रम्प उघडपणे अपमान करत आहेत!

## भारताने सर्व वाटाघाटीतून माघार घ्यावी'; GTRI ने दिला सल्ला?

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**आर्थिक थिंक टँक 'ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह'च्या (GTRI) ने शनिवारी भारताने अमेरिकेबरोबरील वाटाघाटीमधून माघार घेतली पाहिजे. तसेच ट्रम्प प्रशासनाबरोबर चीन आणि कॅनडा सारख्या देशांप्रमाणे व्यवहार ठेवण्याची तयारी ठेवावी असे मत व्यक्त केले आहे.अमेरिकेच्या फायद्यासाठी अनुकूल असलेल्या व्यापार मागण्या मान्य करण्यासाठी अमेरिका भारतावर प्रचंड दबाव आणत आहे असेही ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्हचे संस्थापक अजय श्रीवास्तव म्हणाले आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या अधिकाऱ्यांनी बहुतेक वेळा चुकीचा डेटा वापरून भारतावर टीका केल्याचेही श्रीवास्तव म्हणाले.**

श्रीवास्तव म्हणाले की, “ट्रम्प हे चुकीचा डेटा वापरून उघडपणे भारताचा अपमान करत आहेत. अशा परिस्थितीत कोणतेही संतुलित निष्कर्षापर्यंत पोहचणे शक्य नाही. भारताने सर्व वाटाघाटींमधून माघार घेतली पाहिजे आणि इतर देशांप्रमाणे त्यांचा करण्याची तयारी ठेवावी.” अमेरिकेने लादलेल्या करांच्या विरोधात चीन आणि कॅनडाने देखील जोरदार प्रत्युत्तर देण्यास सुरूवात केली आहे. शुक्रवारी ट्रम्प यांनी दावा केला होता की, त्यांनी भारताच्या अनुचित व्यापार पद्धती उघड केल्यानंतर भारताने अमेरिकेतून आयात होणाऱ्या मलावरील कर कपात करण्यास होकार दिला आहे. मात्र श्रीवास्तव यांनी ट्रम्प यांचा दावा फेटाळून लावला आहे. “हे साफ खोटे आहे आणि याचा भारतावर दबाव टाकण्याचा उद्देश आहे. भारताची शांतता ही गोंधळात टाकणारी आहे आणि भारताने खऱ्या माहितीसह उत्तर देणे आवश्यक आहे. ट्रम्प आणि त्यांचे अधिकारी भारताला कमी लेखत असल्याचे संपूर्ण जग पाहात आहे,” असे श्रीवास्तव म्हणाले आहेत.अमेरिकेने चीन,



कॅनडा, मेक्सिको आणि भारतावर कर लादण्याची घोषणा केली होती. ट्रम्प यांनी चीनवर २० टक्के आणि कॅनडावर २५ टक्के कर लादण्याची घोषणा केली होती. तर भारतावर देखील रेसिप्रोकल टेरिफ लावणार असल्याचे म्हटले. ट्रम्प यांच्या या घोषणेनंतर चीन आणि कॅनडा यांनी प्रत्युत्तर दिले आहे.
कॅनडाने देखील ३० अब्ज कॅनेडियन डॉलर किमतीच्या अमेरिकन आयातीवर कर लावला आहे. तसेच अमेरिकन मालावर २५ टक्के अतिरिक्त सरचार्ज लावला आहे. तर चीनने अमेरिकेवर तेवढाच कर लावला आहे जितका अमेरिकेने चिनी मालावर लावला आहे.अमेरिकेने भारताबरोबर द्विपक्षीय व्यापार वाढवण्यासाठी प्रॉडक्ट-बाय-प्रॉडक्ट व्यवस्थेशिवाय एका मोठ्या आणि व्यापक व्यापारी कराराचा प्रस्ताव पुढे ठेवला आहे. जीटीआरआयच्या एका रिपोर्टनुसार, हा व्यापारी करारमध्ये फक्त टॅरिफ मध्ये कपात नाही तर सरकारी खरेदी, कृषी सब्सिडी, पेटेंट कायदे आणि अनरिस्ट्रीक्टेड डेटा फ्लो संबंधीच्या मागण्या देखील मान्य होतील, ज्याला पूर्वीपासून भारताचा विरोध राहिला आहे.
तसेच यामध्ये शिफारस करण्यात आली होती की भारताने ९० टक्क्यांहून अधिक औद्योगिक मालाचा समावेश असलेली एक व्यापक शुल्क व्यवस्थेचा विचार करावा. ज्यानुसार भारत तेव्हाच शुल्क रद्द करेल जेव्हा अमेरिका देखील असाच निर्णय घेईल.“ट्रम्प हे चुकीचा डेटा वापरून उघडपणे भारताचा अपमान करत आहेत. अशा परिस्थितीत कोणतेही संतुलित निष्कर्षापर्यंत पोहचणे शक्य नाही. भारताने सर्व वाटाघाटींमधून माघार घेतली पाहिजे आणि इतर देशांप्रमाणे त्यांचा करण्याची तयारी ठेवावी.” अमेरिकेने लादलेल्या करांच्या विरोधात चीन आणि कॅनडाने देखील जोरदार प्रत्युत्तर देण्यास सुरूवात केली आहे.
शुक्रवारी ट्रम्प यांनी दावा केला होता की, त्यांनी भारताच्या अनुचित व्यापार पद्धती उघड केल्यानंतर भारताने अमेरिकेतून आयात होणाऱ्या मलावरील कर कपात करण्यास होकार दिला आहे. मात्र श्रीवास्तव यांनी ट्रम्प यांचा दावा फेटाळून लावला आहे. “हे साफ खोटे आहे आणि याचा भारतावर दबाव टाकण्याचा उद्देश आहे. भारताची शांतता ही गोंधळात टाकणारी आहे आणि भारताने खऱ्या माहितीसह उत्तर देणे आवश्यक आहे. असे श्रीवास्तव म्हणाले आहेत. अमेरिकेने चीन, कॅनडा, मेक्सिको आणि भारतावर कर लादण्याची घोषणा केली होती. ट्रम्प यांनी चीनवर २० टक्के आणि कॅनडावर २५ टक्के कर लादण्याची घोषणा केली होती. तर भारतावर देखील रेसिप्रोकल टेरिफ लावणार असल्याचे म्हटले.ट्रम्प यांच्या या घोषणेनंतर चीन आणि कॅनडा यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

### कराराचा प्रस्ताव पुढे ठेवला

अमेरिकन मालावर २५ टक्के अतिरिक्त सरचार्ज लावला आहे. तर चीनने अमेरिकेवर तेवढाच कर लावला आहे जितका अमेरिकेने चिनी मालावर लावला आहे.अमेरिकेने भारताबरोबर द्विपक्षीय व्यापार वाढवण्यासाठी प्रॉडक्ट-बाय-प्रॉडक्ट व्यवस्थेशिवाय एका मोठ्या आणि व्यापक व्यापारी कराराचा प्रस्ताव पुढे ठेवला आहे.

---

# दिल्लीत महिलांना दरमहा मिळणार २५०० रुपये!

## महिला समृद्धी योजनेला दिल्ली सरकारने दिली मंजूरी

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी भारतीय जनता पक्षाने दिलेले आश्वासन पूर्ण केले आहे. दिल्ली शरकारने महिला समृद्धी योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना महिन्याला २५०० रूपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी शनिवारी याबद्दलची घोषणा केली आहे.**



आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित भाजपा महिला मोर्चाच्या अधिवेशनाच्या समारोपावेळी बोलताना गुप्ता यांनी याबद्दल माहिती दिली आहे. महिला दिनाचे पार्श्वभूमीवर दिल्ली मंत्रिमंडळाची बैठक बोलावण्यात आली आणि महिला समृद्धी योजनेअंतर्गत आमच्या जाहिरनाम्यात दिल्लीच्या महिलांना दिलेले वचन पूर्ण केले असे रेखा गुप्ता यांनी सांगितले. आम्ही दिल्लीतील गरीब बहिणींना दरमहा २५०० रुपये मिळतील असे आश्वासन दिले होते. आज आम्ही यावर शिक्कामोर्तब केले आहे. आम्ही या योजनेला मान्यता दिली आहे आणि या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात ५१०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे, जेणेकरून आम्हाला योजनेअंतर्गत लाभ देण्यास सुरुवात करता येईल,” असे रेखा गुप्ता पुढे बोलताना म्हणाल्या. ही योजना लागू करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे असेही गुप्ता यांनी सांगितले. या समितीमध्ये अशिष सूद परवेश वर्मा आणि कपिल मिश्रा या कॅबिनेट मंत्र्यांचा देखील समावेश असणार आहे. तसेच त्यांनी लवकरच योजनेच्या नोंदणीसाठी पोर्टल आणि योजनेचे निकष देखील लवकरच जारी केले जातील असेही यावेळी सांगितले. ज्यामध्ये आर्थिक लाभाचे पारदर्शकपणे आणि कुठल्याही अडचणींशिवाय योग्य वितरण व्हावे यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी आधार-आधारित ई-केवायसीचा वापर केला जाईल, असेही सांगण्यात आले आहे.

### रेखा गुप्ता नेमकं काय म्हणाल्या?

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित भाजपा महिला मोर्चाच्या अधिवेशनाच्या समारोपावेळी बोलताना गुप्ता यांनी याबद्दल माहिती दिली आहे. महिला दिनाचे पार्श्वभूमीवर दिल्ली मंत्रिमंडळाची बैठक बोलावण्यात आली आणि महिला समृद्धी योजनेअंतर्गत आमच्या जाहिरनाम्यात दिल्लीच्या महिलांना दिलेले वचन पूर्ण केले.

# पुरस्कार मिळताच निवेदिता सराफ झाल्या भावुक!

'झी चित्र गौरव' पुरस्कार सोहळ्यात यावर्षी ज्येष्ठ अभिनेत्री निवेदिता सराफ यांचा सन्मान करण्यात आला. विविध मालिका, चित्रपट, नाटक यांच्या माध्यमातून गेली वर्षानुवर्षे निवेदिता सराफ रसिक प्रेक्षकांचं भरभरून मनोरंजन करत आहेत. विशेष म्हणजे या संपूर्ण प्रवासात त्यांनी आपल्या घराची जबाबदारी सुद्धा उत्तमप्रकारे सांभाळली. घर-संसार याकडे लक्ष देऊन त्यांनी मोठ्या जबाबदारीने आपलं करिअर सुद्धा घडवलं. या सगळ्या प्रवासात निवेदिता अशोक सराफ यांच्या पाठीशी सुद्धा नेहमीच खंबीरपणे उभ्या राहिल्या. अभिनेत्री सोनाली कुलकर्णीने खास परफॉर्मन्स सादर करत या ज्येष्ठ अभिनेत्रीला मानवंदना दिली. निवेदिता यांच्या चित्रपटांतील लोकप्रिय गाण्यावर सोनालीने नृत्याविष्कार सादर केला. यानंतर निवेदिता यांना मंचावर आमंत्रित करण्यात आलं.



यावेळी त्या प्रचंड भावुक झाल्याचं पाहायला मिळालं.पुरस्कार स्वीकारण्यासाठी मंचावर जाण्याआधी निवेदिता सराफ यांनी पाया पडून पती अशोक सराफ व अभिनेते सचिन पिळगांवकर यांचे आशीर्वाद घेतले. यानंतर अशोक सराफ यांनी देखील पत्नीला दोन्ही हात जोडून नमस्कार केला. संसार आणि करिअर दोन्ही गोष्टी जबाबदारीने सांभाळल्याबद्दल तिचे आभार मानले.निवेदिता सराफ म्हणाल्या, "अशोक तू मंचावर आल्याशिवाय मी हा पुरस्कार स्वीकारू शकत नाही... आता मी खूप भावनिक झालेय... खरंतर, हा माझ्या माहेरचा पुरस्कार आहे असं म्हणायला हरकत नाही कारण, 'झी मराठी'शी माझं खूप जवळचं नातं आहे. दहाव्या वर्षापासून मी चित्रपटात काम करण्यास सुरुवात केली.

## आता महासंगम नाही महासंग्राम

टीव्हीवर प्रदर्शित होणाऱ्या मालिका या प्रेक्षकांच्या अत्यंत जवळच्या असतात. काही मालिका या रोजच्या जीवनाचा भाग बनतात.मालिकेतील एक भाग संपल्यानंतर दुसऱ्या भागात काय होणार, ही उत्सुकता असल्याने प्रेक्षक पुढचा भाग प्रदर्शित होण्याची आतुरतेने वाट बघत असतात. या मालिकांमधील एखादे पात्र प्रेक्षकांच्या अत्यंत जवळचे बनते, एखाद्या पात्राचा तिरस्कार केला जातो. मालिकेतील ट्विस्ट प्रेक्षकांची उत्सुकता कायम ठेवतात. आता येणाऱ्या काळात प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन होणार आहे. झी मराठी वाहिनीने सोशल मिडियावर एक प्रोमो शेअर केला आहे. झी मराठीने इन्स्टाग्रामच्या अधिकृत अकाउंटवर एक प्रोमो शेअर केला आहे. ज्यामध्ये लीला, तुळजा, सावली, पारू, भावना, शिवा दिसत आहेत. त्यांच्यामागे होळी दिसत आहे. लीला म्हणते, "या होळीला प्रेमाने मनं जिंकली जाणार", भावना म्हणते, "सत्याचा विजय होणार", पारू म्हणते, "दुष्टांचा संहार होणार", जान्हवी म्हणते, "खोट्याचा पडदा फाश होणार", शिवा म्हणते, "जो नडणार त्याला फोडणार", सावली म्हणते, "अन्यायाला वाचा फुटणार", तुळजा म्हणते, "बस झालं सहन करणं, आता युद्ध होणार."याच प्रोमोमध्ये पुढे पाहायला मिळते की लीला, पारू, शिवा एकत्र उभ्या आहेत. पारू म्हणते, "आता खलनायिकांच्या चेहऱ्यावरचे रंग उडणार. कारण..." , पुढे शिवा म्हणते, "होळीची आग पेटणार नाही, भडकणार", लीला म्हणते, "आता महासंगम नाही महासंग्राम होणार", त्यानंतर सर्व अभिनेत्री एकत्र येत असल्याचे दिसत आहे.



## मैत्रिणीच्या लग्नात कतरिनाचा डान्स

अभिनेत्री कतरिना कैफ(KATRINA KAIF)ने बूम या चित्रपटातून पदार्पण केले होते. २००३ साली हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. सरकार, मैंने प्यार क्यूँ किया, हमको दिवाणा कर गया, रेस, पठाण, अग्नीपथ, जिंदगी ना मिलेगी दोबारा, एक था टायगर, जब तक हैं जान, झिरो, अशा अनेक चित्रपटातून कतरिना कैफने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अभिनयाबरोबरच ती डान्ससाठीदेखील ओळखली जाते. आता अभिनेत्रीच्या एका डान्सचा व्हिडीओ सोशल मीडयावर व्हायरल होताना दिसत आहे. लोकप्रिय अभिनेत्री कतरिना कैफने नुकतीच करिश्मा नावाच्या एका मैत्रीणीच्या लग्नात हजेरी लावली होती. या लग्नातले अनेक फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहे. एका व्हिडीओमध्ये ती सुरज की बाहों में गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. हा व्हिडीओ नेटकऱ्यांच्या पसंतीस उतरत असून हा व्हिडीओ व्हायरल होताना दिसत आहे. या व्हिडीओमध्ये अभिनेत्रीबरोबर कबीर खान यांची मुलगीदेखील दिसत आहे. दोघी सुरज की बाहों में या गाण्यावर थिरकताना दिसत आहेत. हे गाणे लोकप्रिय चित्रपट जिंदगी ना मिलेगी दोबारा या चित्रपटातील आहे. यामध्ये कतरिना कैफ महत्वाच्या भूमिकेत दिसली होती. या चित्रपटात हृतिक रोशन, फरहान अख्तर प्रमुख भूमिकेत दिसले होते.याआधी कतरिनाचा आणखी एक व्हिडीओ व्हायरल होताना दिसला होता. ज्यामध्ये ती ससुराल गेंदा फूल या गाण्यावर डान्स करताना दिसली होती. त्याबरोबरच, कतरिनाने शुक्रवारी तिच्या इन्स्टाग्राम हँडलवर या कार्यक्रमातील काही फोटो शेअर केले होते. ज्यामध्ये कतरिना व तिच्या बहिणीचे काही फोटो पाहायला मिळाले होते.तिची मैत्रीण करिश्मा व तिच्या नवऱ्याची झलकही या फोटोंमध्ये पाहायला मिळाली होती. कतरिनाने तिच्या करिश्माबरोबरच्या १६ वर्षांच्या मैत्रीचा उल्लेख करीत लिहिले, "तुझ्यासारखं कोणीच नाहीये.



सोशल मीडिया हे असे माध्यम आहे, ज्याचा उपयोग सामान्यांपासून ते सर्वांत श्रीमंत व प्रसिद्ध व्यक्तींपर्यंत सर्व जण करतात. मनोरंजनसृष्टीतील कलाकारही या माध्यमातून चाहत्यांच्या संपर्कात असतात. फोटो, व्हिडीओ, त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचे क्षण, नवीन चित्रपट अशा अनेक गोष्टी सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांपर्यंत पोहोचतात. अनेकदा या कलाकारांना ट्रोलदेखील केले जाते. आता मराठी अभिनेत्री मीरा जगन्नाथ(MIRA JAGANNATH)ने यावर वक्तव्य केले आहे. अभिनेत्री मीरा जगन्नाथने नुकतीच 'सुमन म्युझिक मराठी'ला मुलाखत दिली होती. या मुलाखतीत तिला सोशल मीडियावरील ट्रोलिंगबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर बोलताना अभिनेत्रीने म्हटले, "माझ्याबद्दल खूप बोललं जातं. खूप वेळा ते ऐकून मला इतका त्रास होतो की, ते ऐकून मी रडते, हे कोणाला माहीत नाही. फोटोंवर घाण कमेंट्स केले जातात. तुम्ही एक कमेंट करून जाता. पण, तिथे हजारो, लाखो लोक आम्हाला फॉलो करीत असतात. त्या कमेंट्स वाचून, अजून १०-१५ लोकांची कमेंट्स करण्याची हिंमत होते.

## अभिनेत्री मीरा जगन्नाथने केली पोलीस ठाण्यात तक्रार

# रोहितने खेळपट्टीवर टिकणे आवश्यक!

## भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांचे मत

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा कर्णधार रोहित शर्मा गुणी फलंदाज आहे. त्याने खेळपट्टीवर टिकून राहून मोठी खेळी करण्याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्याची खेळपट्टीवरील उपस्थिती भारतासाठी खूप प्रभाव पाडू शकते असे मत भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी व्यक्त केले.**



एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतीय कर्णधार रोहितने वेगवान सुरुवात करण्याचा दृष्टिकोन अवलंबला आहे. पण, या प्रयत्नांत तो अनेकदा लवकर बाद झाला आहे. त्याने वेगवान पवित्रा घेण्यात चूक काहीच नाही. पण, संघाचे हित लक्षात घेता त्याने खेळपट्टीवर अधिक वेळ टिकणे महत्त्वाचे आहे, असे गावस्कर यांनी म्हटले आहे. रोहितने २५ षटके फलंदाजी केली, तर भारताची धावसंख्या १८० ते २०० च्या घरात येईल. तेव्हा जर दोनच गडी बाद झाले असतील तर, अशा वेळी भारत ३५० च्या आसपास मजल निश्चित मारू शकेल, असे गावस्कर यांनी नमूद केले. "वेगवान फलंदाजी करणे हा एक भाग झाला.

पण, त्याने अशा वेळी स्वत:ला अधिक काळ खेळपट्टीवर टिकून राहण्यासाठी थोडा संयम बाळगण्याची गरज आहे. रोहित जेव्हा असा संयम बाळगतो, तेव्हा सामना प्रतिस्पर्ध्याच्या हातून गेलेला असतो," असे गावस्कर यांचे म्हणणे आहे. चॅम्पियन्स करंडक स्पर्धेत बांगलादेशविरुद्धच्या सामन्यातील ४१ धावांची खेळी सर्वाधिक आहे. पाकिस्तानविरुद्ध २०, न्यूझीलंडविरुद्ध १५ आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध २८ धावा केल्या आहे. रोहितसारख्या फलंदाजांनी २५ ते ३० धावसंख्येवर समाधान मानून उपयोगी नाही. तो अधिक षटके किंवा अगदी २५ षटके जरी मैदानात टिकला तरी त्याचा डावावर मोठा प्रभाव पडेल, असे गावस्कर यांनी सांगितले.इंग्लंडचा माजी कर्णधार नासिर हुसेन यांनी भारतविरुद्ध न्यूझीलंड सामना रोमांचकारी होईल असे मत व्यक्त करताना न्यूझीलंडकडे जिंकण्याची क्षमता असल्याचे म्हटले आहे.

न्यूझीलंड संघ हार मानणारा नाही. त्यांच्याकडे दमदार क्रिकेटपटू आहेत. दबावाखाली ते न डगमगता खेळतात, असेही हुसेन म्हणाले. "न्यूझीलंड संघाकडे क्षमता आहे आणि सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी त्यांच्याकडे वचनबद्धता आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या 'आयसीसी'च्या प्रत्येक स्पर्धेत ते उपांत्य फेरी किंवा अंतिम फेरीपर्यंत पोहोचतात," असेही हुसेन यांनी सांगितले.

एकाच मैदानावर खेळायला मिळाल्यामुळे भारताला फायदा झाला या टिकेत अर्थ नाही. जिंकण्यासाठी खेळपट्टीचे स्वरुप किंवा परिस्थिती महत्वाची नसती, तर तुम्हाला चांगले क्रिकेट खेळावे लागते, असे मत भारताचे फलंदाजी प्रशिक्षक सितांशु कोटक यांनी व्यक्त केले. चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत रविवारी भारत आणि न्यूझीलंड दरम्यान अंतिम सामना होणार आहे.

### चांगले क्रिकेट खेळणे गरजेचे!

सामन्यापूर्वीच्या शुक्रवारच्या सराव सत्रानंतर पत्रकार परिषदेत बोलताना कोटक यांनी या सगळ्या चर्चा भारताने जिंकण्यास सुरुवात केल्यानंतरच सुरू झाल्या याकडे लक्ष वेधले.खेळपट्टीच्या स्वरुपामुळे आम्हाला काय फायदा झाला हे समजत नाही. आम्ही जिंकल्यानंतर या चर्चेला सुरुवात झाली. यावर काय बोलायचे ते कळत नाही. खेळपट्टीचे स्वरुप आणि परिस्थिती काहीही असो, तुम्हाला जिंकायचे असेल, तर चांगले क्रिकेट खेळणे आवश्यक असते,"असे कोटक म्हणाले. "तुम्ही जर चांगले क्रिकेट खेळला नाही, तर तुम्हाला तक्रारी करता येत नाही. जिंकल्यावर त्या संघाला फायदा झाला हे बोलण्यातही काही अर्थ नाही. आम्ही फक्त येथे सराव करतो आणि खेळतो म्हणून आम्हाला फायदा झाला असे मला वाटत नाही. आम्ही चांगले क्रिकेट खेळलो हेच सत्य आहे,"असेही कोटक यांनी सांगितले. आमचा सराव 'आयसीसी' प्रशिक्षण केंद्रावर होते आणि सामने 'डीआयसीएस'मधील खेळपट्ट्यांवर खेळतो.

---

# विल्यम्सन विरुद्ध फिरकी संघर्ष लक्षवेधक!

## माजी कर्णधाराची खेळी निर्णायक ठरण्याचा तज्ज्ञांचा अंदाज

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**न्यूझीलंडचा माजी कर्णधार केन विल्यम्सन आणि भारतीय फिरकी गोलंदाज यांच्यातील संघर्ष हा चॅम्पियन्स करंडक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यातील परमोच्च क्षण असेल, असा अंदाज क्रिकेट पंडित व्यक्त करत आहेत.भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील अंतिम लढत मुळात अधिक तीव्र असेल.**



त्यात फिरकी गोलंदाजी उत्तम खेळू शकणारा विल्यम्सनसारखा फलंदाज न्यूझीलंडकडे असल्यामुळे अंतिम सामन्यातील चढाओढ एक वेगळी उंची गाठेल. तेवढी क्षमता विल्यम्सनच्या फलंदाजीत आहे, असे मानले जात आहे. न्यूझीलंडने २००० मध्ये केनियात झालेल्या 'आयसीसी' नॉक-आऊट स्पर्धेत भारताला चार गडी राखून हरवताना विजेतेपद मिळविले होते. आता २५ वर्षांनी पुन्हा एकदा भारताला हरवून विजेतेपद मिळविण्यासाठी न्यूझीलंड संघ उत्सुक आहे. दुसरीकडे भारतदेखील दुसऱ्यांदा विजेतेपदासाठी तेवढाच उत्सुक आहे. आतापर्यंत यशस्वी झालेले चार फिरकी गोलंदाज खेळविण्याचे नियोजन भारत अंतिम सामन्यात ठेवण्याची शक्यता कायम आहे. साखळी स्पर्धेत पाकिस्तानविरुद्धचा सामना ज्या खेळपट्टीवर खेळविला गेला होता, त्याच फिरकीस अनुकूल खेळपट्टीवर अंतिम लढत होणार आहे.विल्यम्सनचे फिरकी गोलंदाजी खेळण्याचे कौशल्य चांगले आहे. लागोपाठच्या दोन सामन्यांत अर्धशतक आणि शतकी खेळी केल्यामुळे त्याचा आत्मविश्वासही उंचावलेला आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर न्यूझीलंड प्रशिक्षक स्टीड यांनी भारताचे चार फिरकी गोलंदाज खेळविण्याचे नियोजन आव्हानात्मक असल्याचे कबूल केले आहे. "अंतिम सामन्यातही भारत चार फिरकी गोलंदाजासह उतरू शकतो. आमच्याकडेही चार फिरकी गोलंदाज आहेत. आमचा संघ संतुलित आहे. पण, भारतीय फिरकी गोलंदाज हे नेहमीच आव्हानात्मक असतात. यासाठी आमचे नियोजन स्पष्ट असणे आवश्यक आहे," असे स्टीड म्हणाले.

भारतीय फिरकी गोलंदाज त्या दिवशी अपयशी ठरतील की यशस्वी याचा विचार न करता सकारात्मक दृष्टिकोन ठेवून मैदानात उतरणे महत्त्वाचे आहे.

### तेवढी क्षमता विल्यम्सनच्या फलंदाजीत

"सामन्यातील परिस्थितीला जुळवून घेणे महत्त्वाचे असेल. त्याचेळी आमच्या फलंदाजांना भारतीय फिरकीचा कसा सामना करायचा यासाठी वैयक्तिक नियोजन करावे लागेल. विशेषत: वरुण चक्रवर्तीविरुद्ध खेळताना तशी काळजी घ्यावी लागेल. त्याच्याकडे चेंडू टाकण्याच्या युक्तींची पोतडी भरलेली आहे," असे स्टीड यांनी सांगितले.त फिरकी गोलंदाजी उत्तम खेळू शकणारा विल्यम्सनसारखा फलंदाज न्यूझीलंडकडे असल्यामुळे अंतिम सामन्यातील चढाओढ एक वेगळी उंची गाठेल. तेवढी क्षमता विल्यम्सनच्या फलंदाजीत आहे, असे मानले जात आहे. न्यूझीलंडने २००० मध्ये केनियात झालेल्या 'आयसीसी' नॉक-आऊट स्पर्धेत भारताला चार गडी राखून हरवताना विजेतेपद मिळविले होते. आता २५ वर्षांनी पुन्हा एकदा भारताला हरवून विजेतेपद मिळविण्यासाठी न्यूझीलंड संघ उत्सुक आहे. दुसरीकडे भारतदेखील दुसऱ्यांदा विजेतेपदासाठी तेवढाच उत्सुक आहे. आतापर्यंत यशस्वी झालेले चार फिरकी गोलंदाज खेळविण्याचे नियोजन भारत अंतिम सामन्यात ठेवण्याची शक्यता कायम आहे. साखळी स्पर्धेत पाकिस्तानविरुद्धचा सामना ज्या खेळपट्टीवर खेळविला गेला होता, त्याच फिरकीस अनुकूल खेळपट्टीवर अंतिम लढत होणार आहे. विल्यम्सनचे फिरकी गोलंदाजी खेळण्याचे कौशल्य चांगले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती
। रविवार।
। दि. 9 मार्च 2025।

## हवा प्रदूषणाच्या विरोधात

# वाकड-ताथवडेतील सोसायटीधारकांचा एल्गार!

### सिमेंट मिक्स धुळेमुळे हवा प्रदूषणाचा वाढता धोका : नागरिकांचा मूक मोर्चा

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ताथवडे परिसरातील २२ हून अधिक गृहनिर्माण सोसायट्यांचे ५०० पेक्षा जास्त रहिवासी आज “हवा प्रदूषण विरोधात एकत्र आले. मूक मोर्चा काढून नागरिकांनी सिमेंट मिक्स धुळ आणि बांधकामाच्या धुळीमुळे वाढलेल्या प्रदूषणाकडे लक्ष वेधले. प्रदूषणाच्या विरोधात आवाज उठवत स्वच्छ व निरोगी पर्यावरण आमचा हक्क असून त्याकडे प्रशासनाने लक्ष केंद्रित करावे अशी ही मागणी नागरिकांनी केली.**




वाकड-ताथवडे हौसिंग सोसायटीज फोरम यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा कोहिनूर कोर्टयार्ड वन सोसायटी पासून इंदिरा स्कूल मार्गे वाकडकर चौकापर्यंत नेण्यात आला. या मोर्चात ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

नागरिकांनी मूक मोर्चा द्वारे पर्यावरण, प्रदूषण, नागरिकांना भेडसावणाऱ्या आरोग्याच्या समस्यांकडे लक्ष वेधले. सिमेंट मिक्स धूळ आणि रस्त्यावरील अवजड वाहनांमुळे होणारे प्रदूषण यामुळे परिसरातील हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून श्वसनाचे आजार वाढत आहेत असा मुद्दा यावेळी नागरिकांनी उपस्थित केला.

हवेची गुणवत्ता दररोज घसरत असल्यामुळे परिसरातील लहान मुले, वृद्ध आणि गरोदर महिलांमध्ये दम्याचे, ॲलर्जीचे आणि श्वसनासंबंधी आजारांचे प्रमाण वाढत आहे. याकडे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि स्थानिक लोकप्रतिनिधींकडे अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. हवेची गुणवत्ता घसरल्यामुळे, प्रदूषण वाढल्याने नैसर्गिक जीवनमानावर परिणाम दिसून येत आहे. सिमेंटच्या धुळीचा थर रस्त्यांवर, गाड्यांवर आणि घरांवर साचत असून नागरिकांचे जीवनमान ढासळत आहे.

#### नागरिकांच्या प्रमुख मागण्या...

1. सिमेंट मिक्स धूळ त्वरित बंद व्हावी.
2. वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक नियम आणि उपाययोजना लागू कराव्यात.
3. वायू प्रदूषण पातळीची नियमित तपासणी करून अहवाल सार्वजनिक करावा.
4. रस्त्यांची नियमित २ वेळा साफसफाई करून धुळीचे प्रमाण कमी करावे.
5. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनावर कठोर कारवाई केली जावी.
6. रस्त्यांवरील धूळ कमी करण्यासाठी टँकरद्वारे, एअर गन द्वारे नियमितपणे पाण्याचा फवारा मारला जावा.
7. प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करून आवश्यक ती आरोग्यसेवा पुरवावी.
8. रस्त्यांवरील झाडांची देखभाल आणि पाणी नियमित करावे.

---

## चऱ्होलीच्या शहरीकरणावर डाक विभागाचा ‘स्टँम्प’

### नवीन डाक उप विभागीय कार्यालयाचे लोकार्पण : भाजपा आ.महेश लांडगे यांचा पाठपुरावा

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत 1997 मध्ये समाविष्ट झालेल्या चऱ्होली आणि परिसराच्या शहरीकरणावर आणि डेव्लपमेंटवर अखेर भारतीय डाक विभागाने शिक्कामोर्तब केले आहे. चऱ्होलीला ग्रामीण ऐवजी आता शहरी ‘पिन कोड’ मिळाला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत 1997 मध्ये समाविष्ट झालेल्या चऱ्होली आणि परिसराच्या शहरीकरणावर आणि डेव्लपमेंटवर अखेर भारतीय डाक विभागाने शिक्कामोर्तब केले आहे. चऱ्होलीला ग्रामीण ऐवजी आता शहरी ‘पिन कोड’ मिळाला आहे.**




वाढते शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे चऱ्होली येथे असलेल्या शाखा डाक घरामार्फत देण्यात येणाऱ्या पोस्टाच्या सेवांवर अतिरिक्त ताण येत होता. या पार्श्वभूमीवर चऱ्होलीला शहरी पिन कोड मिळावा आणि डाक उप कार्यालय सुरू करण्याचा निर्णय डाक विभागाने घेतला. त्यासाठी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आणि आज डाक कार्यालयाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी माजी महापौर नितीन काळजे, पुणे क्षेत्राचे पोस्टमास्टर जनरल रामचंद्र जायभाये आणि पुणे ग्रामीण डाक विभागाचे अधीक्षक बाळकृष्ण एरंडे उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते सचिन तापकीर, अजित बुर्डे, माजी नगरसेवक, सुवर्णा बुरडे, माजी नगरसेवक सुनील काटे, गणेश सस्ते, योगेश तळेकर, सहायक अधीक्षक डाकघर जुन्नर उपविभाग भूषण देशमुख, सहाय्यक अधीक्षक वेस्ट सब डिव्हिजन मुन्ना कुमार, निरिक्षक डाकघर खेड उपविभाग मारुती मेढे, तक्रार निरीक्षक पुणे ग्रामीण विभाग लक्ष्मण शेवाळे व चऱ्होली परिसरतील नागरिक उपस्थित होते. आमदार महेश लांडगे यांनी चऱ्होली शाखा डाकघराचे उपडाकघरात रूपांतर करण्याचा प्रस्ताव डाक विभागाला सादर केला होता.

#### डाक मेळाव्याला ग्रामस्थांचा प्रतिसाद...

यावेळी प्राताविक करताना पुणे ग्रामीण डाक विभागाचे अधीक्षक बाळकृष्ण एरंडे यांनी डाक विभागाच्या सर्व बचत योजना, आधार कार्ड अध्यतन सेवा, डाक विमा योजना,अपघाती विमा योजना तसेच पार्सल पाठवण्याची सुविधा या सेवांचा लाभ चऱ्होली उपडाकघरामार्फत ग्रामस्थांना घेता येणार असल्याचे मनोगत व्यक्त केले. चऱ्होली उपडाकाघराचे प्रथम उपडाकपाल म्हणून बबन ढेरंगे यांची नियुक्ती केली आहे. यावेळी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिला विमा प्रतिनिधी व महिला कर्मचारी यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच आज डाक मेळावा याचे पण आयोजन करण्यात आले होते.


EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
TOMORROW'S
LEADERS
ARE MADE HERE
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
779 676 7292
BRANCHES AT: DHANORE | CHARHOLI | MOSHI


WTE
Provider of Sustainable
Water and Waste Water Treatment Solution Globally